
**ePaper** मोस्ट वॉन्टेड दहशतवादी दाऊद इब्राहिमवर विषप्रयोग, प्रकृती गंभीर!



| वर्ष - 7 । अंक - 220 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- गुणतालिकेत भारत अव्वल!
- सई लोकूरला कन्यारत्न
- महिलांना पुरुषांपेक्षा कमी पगार
- खडसेंनी पक्षात राहून चोऱ्या केल्या


www.mahaenews.com । सोमवार, दिनांक 18 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# नगर कल्याण महामार्गावर तिहेरी अपघात!

## 8 जणांचा मृत्यू, एका कुटुंबातील चौघांचा समावेश

। पुणे ।

महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नगर कल्याण महामार्गावरील डिंगोरे हद्दीतील अंजिराची बाग येथे तिहेरी भीषण अपघात होऊन आठ जण जागीच मृत्युमुखी पडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या अपघातात ओतूर वरुन कल्याणच्या दिशेने जाणाऱ्या पिकअपने रिक्षा आणि ट्रकला जोरदार धडक दिली. यामध्ये पाच पुरुष, एक महिला आणि दोन लहान मुले यांचा जागीच मृत्यू झाला असल्याची माहिती समोर आली आहे.**



डिंगोरे येथील अपघाताची ही माहिती समजतात ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे व त्यांची टीम घटनास्थळी दाखल झाली. पोलिसांकडूनस्थानिकांसह मदत कार्य चालू असल्याचे पुढे आले आहे. या अपघाताचा पुढील तपास ओतूर पोलीस करत असून अपघातात मृत्यू झालेल्यांचे मृतदेह ओतूर येथे शवविच्छेदन करण्यासाठी आणण्यात आले आहेत. मढ येथील भाजीपाला व्यवसाय करणारे पती,पत्नी आणि दोन लहान मुलांचा मृतांमध्ये समावेश. या अपघातातील मृतांची एकूण ची संख्या आठ आहे. यात पाच पुरुष, एक महिला आणि दोन लहान मुलांचा समावेश आहे. गणेश मस्करे ( वय ३०), कोमल मस्करे ( वय २५ वर्ष ) हर्षद मस्करे (वय ४ वर्ष) काव्या मस्करे (वय ६ वर्ष) अशी मृतांची नावे आहेत. अन्य मृतांची नवे अद्याप समोर आली नसून या घटनेनंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पुढील कारवाई करण्याचे काम सुरू आहे.

### रविवार ठरला अपघातवार

» रविवारी सकाळी नागपूरमधील सोलार कंपनीत स्फोटकांचा स्फोट होऊन झालेल्या अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला होता. यानंतर पुणे नाशिक महामार्गावर देखील अपघात होऊन कारमधून प्रवास करणाऱ्या चार जणांचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली होती. आता, पुणे जिल्ह्यात देखील नगर कल्याण महामार्गावर भीषण अपघात झाल्याची बातमी समोर आली आहे. या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला असून यामध्ये एक कुटुंब संपलं आहे.

### मृत्तांमध्ये दोन मुलांचाही समावेश

» याबाबत पोलीस आणि घटनास्थळावरून मिळालेली माहिती अशी की, रविवारी रात्री जुन्नर तालुक्यातील डिंगोरे गावा जवळील अंजीराची बाग येथे ट्रक , टेम्पो आणि रिक्षा यांचा अपघात झाला. यात पिकअप आणि रिक्षामधील आठ जणांचा जागीच मृत्यू झाला. पिकअप ओतूरवरून कल्याणकडे तर रिक्षा आणि ट्रक ओतूरकडे येत असल्याचे समजते. दरम्यान मृत्तांमध्ये दोन मुलांचाही समावेश आहे.

---

# अपघातातील वाहन परत देण्यासाठी मागितली दीड लाखांची लाच

## सहायक फौजदार गजाआड, पिंपरीतील चिखली पोलीस ठाण्यात 'एसीबी'ची कारवाई

। पुणे ।महाईन्यूज ।

**अपघातानंतर जप्त केलेले वाहने परत करण्यासाठी दीड लाख रुपयांची लाच मागणाऱ्या सहायक पोलीस फौजदाराला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) पकडले. पिंपरी-चिंचवडमधील चिखली पोलीस ठाण्यात पहाटे एसीबीच्या पथकाने ही कारवाई केली.**



नरेंद्र लक्ष्मण राजे (वय ५४) असे लाचखोर सहायक फौजदाराचे नाव आहे. राजे पिंपरी चिंचवड शहरातील चिखली पोलीस ठाण्यात नियुक्तीस आहे. याबाबत एका तरुणाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती. तरुणाच्या गाडीचा अपघात झाला होता. याप्रकरणी चिखली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. अपघातानंतर जप्त केलेले वाहन तरुणाला परत देण्यासाठी राजे याने दीड लाख रुपयांची मागणी केली होती. तडजोडीत तरुणाने एक लाख रुपये देण्याचे मान्य केले.

तरुणाने राजे याला ७० हजार रुपये दिले होते. लाचेची उर्वरित रक्कम देण्यासाठी राजेने तगादा लावला होता. राजेच्या त्रासामुळे अखेर तरुणाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली. तक्रारीची पडताळणी करुन पहाटे पाचच्या सुमारास चिखली पोलीस ठाण्यात सापळा लावण्यात आला. तरुणाकडून २० हजार रुपयांची लाच घेताना राजे याला पकडण्यात आले.

### यांनी केली कारवाई...

» पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे, पोलीस शिपाई भूषण ठाकूर, सुराडकर, हवालदार चव्हाण यांनी ही कारवाई केली.

# शिक्षक भरती उमेदवारांना दिलासा

## » शिक्षण आयुक्तांनी दिला महत्त्वाचा आदेश...

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील शिक्षक भरतीकडे डोळे लावून बसलेल्या राज्यभरातील हजारो उमेदवारांना दिलासा देणारी बातमी आहे. शिक्षक भरती प्रक्रियेत पवित्र संकेतस्थळावर तत्काळ जाहिराती देण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी दिले आहेत. राज्यात शिक्षकांच्या तीस हजार भरती करण्याची घोषणा करण्यात आली आहे. त्यासाठी अभियोग्यता चाचणी घेऊन त्याचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. मात्र बिंदुनामावली तपासणी, शिक्षक समायोजन अशी तांत्रिक प्रक्रिया लांबली आहे.**



शिक्षक भरतीच्या जाहिराती पवित्र संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याची सुविधा ऑक्टोबरमध्येच उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र अद्याप जाहिराती प्रसिद्ध झालेल्या नसल्याने त्यासाठी उमेदवारांनी उपोषण, आंदोलनेही केली. या पार्श्वभूमीवर पवित्र संकेतस्थळावर जाहिरात देण्याबाबत शिक्षण आयुक्तांनी राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना परिपत्रकाद्वारे निर्देश दिले. पवित्र संकेतस्थळावर जाहिरात देण्यासाठी रिक्त पदांचे सामाजिक आरक्षण, अध्यापनाचे गट, विषयनिहाय रिक्त पदांची माहिती संकेतस्थळावर नोंद करण्याची सुविधा प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्या लॉगिनवर देण्यात आली आहे. त्यानंतर प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी नोंद केलेली माहितीची पडताळणी करून ती योग्य असल्यास बिंदुनामावली, विषयनिहाय रिक्त पदांसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी लॉगिनद्वारे मान्य करायची आहे. त्यानंतर प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्या लॉगिनवर जाहिरात तयार करणे (जनरेट ॲडव्हर्टाइजमेंट) यावर क्लिक केल्यावर जिल्हा परिषदेकडील शिक्षक रिक्त पदांची जाहिरात तयार होणार आहे. ही कार्यवाही करण्यासाठी आवश्यक आरक्षणनिहाय रिक्त पदे, गट, विषयनिहाय रिक्त पदांच्या माहितीची पडताळणी करून जाहिरात देण्यासाठी तयार ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शिक्षक भरती विनाविलंब होण्यासाठी पवित्र संकेतस्थळावरील सूचनांनुसार तत्काळ जाहिरातदेण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. राज्यातील शिक्षक भरतीकडे डोळे लावून बसलेल्या राज्यभरातील हजारो उमेदवारांना दिलासा देणारी बातमी आहे. शिक्षक भरती प्रक्रियेत पवित्र संकेतस्थळावर तत्काळ जाहिराती देण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी दिले आहेत. राज्यात शिक्षकांच्या तीस हजार भरती करण्याची घोषणा करण्यात आली आहे. त्यासाठी अभियोग्यता चाचणी घेऊन त्याचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. मात्र बिंदुनामावली तपासणी, शिक्षक समायोजन अशी तांत्रिक प्रक्रिया लांबली आहे. शिक्षक भरतीच्या जाहिराती पवित्र संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याची सुविधा ऑक्टोबरमध्येच उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र अद्याप जाहिराती प्रसिद्ध झालेल्या नसल्याने त्यासाठी उमेदवारांनी उपोषण, आंदोलनेही केली. शिक्षक भरतीच्या जाहिराती पवित्र संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याची सुविधा ऑक्टोबरमध्येच उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र अद्याप जाहिराती प्रसिद्ध झालेल्या नसल्याने त्यासाठी उमेदवारांनी उपोषण, आंदोलनेही केली. या पार्श्वभूमीवर पवित्र संकेतस्थळावर जाहिरात देण्याबाबत शिक्षण आयुक्तांनी राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना परिपत्रकाद्वारे निर्देश दिले. पवित्र संकेतस्थळावर जाहिरात देण्यासाठी रिक्त पदांचे सामाजिक आरक्षण, अध्यापनाचे गट, विषयनिहाय रिक्त पदांची माहिती संकेतस्थळावर नोंद करण्याची सुविधा प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्या लॉगिनवर देण्यात आली आहे.

### उमेदवारांना दिलासा देणारी बातमी

» प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्या लॉगिनवर जाहिरात तयार करणे (जनरेट ॲडव्हर्टाइजमेंट) यावर क्लिक केल्यावर जिल्हा परिषदेकडील शिक्षक रिक्त पदांची जाहिरात तयार होणार आहे. ही कार्यवाही करण्यासाठी आवश्यक आरक्षणनिहाय रिक्त पदे, गट, विषयनिहाय रिक्त पदांच्या माहितीची पडताळणी करून जाहिरात देण्यासाठी तयार ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शिक्षक भरती विनाविलंब होण्यासाठी पवित्र संकेतस्थळावरील सूचनांनुसार तत्काळ जाहिरातदेण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.राज्यातील शिक्षक भरतीकडे डोळे लावून बसलेल्या राज्यभरातील हजारो उमेदवारांना दिलासा देणारी बातमी आहे. शिक्षक भरती प्रक्रियेत पवित्र संकेतस्थळावर तत्काळ जाहिराती देण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी दिले आहेत.

# तळवडे घटनेत आत्तापर्यंत १४ जणांचा मृत्यू

## » आरोपी शरद सुतारला पोलिसांनी घेतलं ताब्यात

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील तळवडे या ठिकाणी स्पार्कल कॅण्डलच्या कारखान्याला भीषण आग लागून जागीच सहा महिला कामगारांचा मृत्यू झाला होता. इतर गंभीर जखमी कामगारांना पुण्यातील ससून रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं होतं. ससून रुग्णालयात उपचार घेत असलेल्या उषा पाडवी (वय-४०) यांचे आज सकाळी पावणेदहाच्या सुमारास निधन झालं.**



तळवडे आगीच्या घटनेतील मृतांचा आकडा आता १४ वर पोहोचला आहे. घटनेमध्ये गंभीर जखमी असलेल्या शरद सुतारला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला असून पोलिसांनी ताब्यात घेतल आहे. शरद सुतार हा शिवराज एन्टरप्रायजेस कंपनीचा मालक आहे. त्याच ठिकाणी स्पार्कल कँडल बनवल्या जात होत्या. जखमींना ससून रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. त्यातील प्रतीक्षा तोरणे, कविता राठोड, शिल्पा राठोड, प्रियंका यादव, अपेक्षा तोरणे, कमल चौरे, सुमन गोधडे आणि आज उषा पाडवी यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या घटनेतील मृतांचा आकडा आता १४ वर पोहोचला आहे. दरम्यान, नातेवाईकांच्या विनंतीनंतर घटनेतील जखमी रेणुका ताथोड यांना ससून रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला असून त्यांना पुढील उपचारासाठी नातेवाईकांनी अमरावती या ठिकाणी नेले आहे. घटनेतील गुन्हा दाखल असलेला जखमी शरद सुतार याला देखील ससून रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाला असून त्याला पोलिसांनी ताब्यात घेतल आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील तळवडे या ठिकाणी स्पार्कल कॅण्डलच्या कारखान्याला भीषण आग लागून जागीच सहा महिला कामगारांचा मृत्यू झाला होता. इतर गंभीर जखमी कामगारांना पुण्यातील ससून रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं होतं. ससून रुग्णालयात उपचार घेत असलेल्या उषा पाडवी (वय-४०) यांचे आज सकाळी पावणेदहाच्या सुमारास निधन झालं. तळवडे आगीच्या घटनेतील मृतांचा आकडा आता १४ वर पोहोचला आहे. घटनेमध्ये गंभीर जखमी असलेल्या शरद सुतारला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला असून पोलिसांनी ताब्यात घेतल आहे.

# पिंपरी चिंचवड येथे होणार सामाजिक सलोखा आरक्षण परिषद!

## सर्व जाती जाती-धर्मांमध्ये सलोखा, सामाजिक ऐक्य निर्माण व्हावे, हाच या परिषदेचा मुख्य हेतू

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**महाराष्ट्रात विविध समाजाच्यावतीने आरक्षणाची मागणी करण्यात येत आहे. त्यासाठी विविध समाजाचे प्रतिनिधी, कार्यकर्ते रस्त्यावर उतरून आंदोलने, उपोषण करीत आहेत. तसेच सरकार दरबारी निवेदने देऊन आरक्षणाची मागणी करत आहेत. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच काही मंत्री वेळ मारून नेण्यासाठी सरकारच्यावतीने आश्वासने देत आहेत. त्यामुळे अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या आरक्षण प्रश्नाने गंभीर वळण घेतले आहे. त्यामुळे जाती जातीत दुरावा आणि संभ्रम निर्माण होत आहे. सर्व जाती जातीमध्ये, धर्मांमध्ये सलोखा, सामाजिक ऐक्य निर्माण व्हावे. यासाठी पिंपरी चिंचवड शहरात सामाजिक सलोखा आरक्षण परिषदेचे लवकरच आयोजन करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.**



महागाई, पाऊस पाणी, बेरोजगारी या समस्यांमुळे सर्वसामान्य नागरिक तणावात आणि त्रस्त आहेत. समतेचा आणि पुरोगामी विचारांचा पुरस्कार करणाऱ्या आणि शिव, शाहू, फुले, आंबेडकर, अण्णाभाऊंचा विचार पुढे नेणाऱ्या महाराष्ट्रात या परिस्थितीत सामाजिक सलोखा निर्माण करणे आवश्यक आहे. सर्व समाजास न्याय मिळावा कुणावरही अन्याय होऊ नये सर्वांच्या मागण्या, अडचणी समजून घ्याव्यात. यासाठी पिंपरी चिंचवड शहरात सामाजिक सलोखा आरक्षण परिषदेचे लवकरच आयोजन येणार आहे. पिंपरीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे शनिवारी झालेल्या बैठकीत विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकारी, प्रतिनिधींनी आपले विचार मांडले.

नियोजित सामाजिक सलोखा आरक्षण परिषदेत एससी, एसटी, ओबीसी, मराठा, मुस्लिम, धनगर, समाजाचे वक्ते आप आपल्या समाजाच्या आरक्षण विषयक भूमिका स्पष्ट करणार आहेत.

### बैठकीला प्रामुख्याने उपस्थित...

» यावेळी मानव कांबळे, प्रकाश जाधव, सतिश काळे, प्रताप गुरव, आनंदा कुदळे, देवेंद्र तायडे, मारुती भापकर, के. डी. वाघमारे, गुलामभाई शेख, विशाल जाधव, विश्वनाथ जगताप, प्रदीप पवार, पांडूरंग परचंडराव, प्रकाश बाबर, बी. बी. शिंदे, रावसाहेब गंगाधरे, किरण खोत, शितल घरत, सुनीता शिंदे, अशोक सातपुते, चंद्रशेखर कणसे, ज्ञानेश्वर मलशेट्टी, संदीप मुटकुळे, ब्रम्हानंद जाधव, राहुल मदने, संतोष कदम, सुरेश भिसे, रजनीकांत क्षिरसागर आदी उपस्थित होते.

---

# चाळीशी नंतर केवळ शरीराचेच नव्हे तर मानसिक आरोग्य देखील महत्त्वाचे!

## डॉ.श्रीपाल सबनीसः पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने "पेन्शनर्स डे" साजरा

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**'तुझं आहे तुजपाशी परी तू जागा चुकल्याशी, या युक्तिप्रमाणे उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीचा योग्य वापर करून उच्च ध्येय गाठावे. आपल्या जीवनात यश मिळवायचे असेल, तर अवितर संघर्ष करण्याची तयारी ठेवली पाहिजे. तरुणांनी स्व:त्व जाणावे. शिक्षण, ज्ञान या शिवाय यश नाही. स्वतः मधले वेगळेपण शोधून स्वतःचे अस्तित्व निर्माण केले पाहिजे, असे मार्गदर्शन प्रा. गणेश शिंदे यांनी केले.**




### 17 डिसेंबर हा दिवस सेवा निवृत्ती वेतनधारक दिन

» **अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी कार्यक्रमात बोलताना सेवानिवृत्त संघटनांच्या विविध मागण्यांचा सकारात्मक विचार करून त्याबद्दल निर्णय घेतला जाईल तसेच चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात दरवर्षी 17 डिसेंबर हा दिवस सेवा निवृत्ती वेतनधारक दिन या कार्यक्रमासाठी राखून ठेवण्यात येईल असे आश्वासन दिले.**

भारत हा तरुणांचा देश आहे तसाच तो वयस्करांचाही देश आहे, सेवानिवृत्तांनी त्यांचे वय वाढले म्हणून नाराज होऊ नये कारण सर्वांचेच वय वाढणार आहे. वयाच्या चाळीसीनंतर केवळ शरीराचेच नव्हे तर मानसिक आरोग्य देखील महत्त्वाचे आहे.यासाठी सेवानिवृत्तांनी नियमित आसने, योगा यासारखा व्यायाम करावा, भजन कीर्तन सोबत संगीताचा आस्वाद घेत मनमोकळे जीवन जगावे आणि पुढील प्रवास सुखकर करावे, असे मार्गदर्शन 89 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सेवा निवृत्ती धारक दिन अर्थात "पेन्शनर्स डे" साजरा करण्यात आला होता. चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे झालेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.सबनीस हे "सेवानिवृत्तांचे आयुष्य" या विषयावर मार्गदर्शन करत होते.

या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, उप आयुक्त मनोज लोणकर, प्रभारी जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, पिंपरी चिंचवड सेवानिवृत्त संघटनेचे अध्यक्ष प्रकाश जवळकर, महापालिका कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष शिवाजीराव तापकीर, महापालिका प्राथमिक शिक्षक संघटनेचे चंद्रकांत झगडे, महानगरपालिका प्राथमिक माध्यमिक शिक्षक संघटनेचे प्रल्हाद गिरी गोसावी, रेल्वे संघटनेचे सुभाष मंत्री, केंद्र सरकार निवृत्ती वेतन संघटनेचे नारायण सोनार, राज्य शासकीय संघटनेचे श्रीराम मोने, जिल्हा परिषद निवृत्त संघटनेचे दिपक रांगणेकर, महिला संघटना प्रतिनिधी मंगला नायडू, प्राथमिक मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष श्रीराम परबत गुरुजी, पदाधिकारी गणेश विपट, डी.डी. फुगे, आर.डी.गायकवाड, यशवंत चासकर, ए.पी.भावसार, कालिंदी डांगे, विजया जीवतोडे, कुमुदिनी घोडके, शैलजा कुलकर्णी आदी उपस्थित होत्या.

आजच्या कार्यक्रमात सेवानिवृत्तांच्या विविध संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आपापली मते व्यक्त केली त्यामध्ये महापालिका सेवानिवृत्त कर्मचारी महासंघ, प्राथमिक शिक्षक संघटना, माध्यमिक शिक्षक संघटना, राज्य सरकारी कर्मचारी संघटना, केंद्र सरकारी कर्मचारी संघटना, पोस्ट खाते संघटना, रेल्वे कर्मचारी संघटना आणि विमा कर्मचाऱ्यांची आदी संघटनांचा समावेश होता. पिंपरी चिंचवड सेवानिवृत्त संघटनेचे अध्यक्ष प्रकाश जवळकर यांनी केलेल्या प्रास्ताविकामध्ये विविध प्रश्न सादर केले, त्यामध्ये महापालिका सेवानिवृत्त कर्मचा-यांना निवृत्ती नंतरची निवृत्ती वेतन रक्कम, भविष्य निर्वाह निधीची रक्कम, अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम मिळण्यासाठी लागणारा प्रदीर्घ कालावधी, अडचणी याबाबत खंत व्यक्त केली. दरवर्षीचा लेखा विभागात सादर करण्यात येणारा हयातीचा दाखला ऑनलाईन करावा, वयाच्या सत्तरीनंतर धन्वंतरी योजनेचा उपयोग, सेवानिवृत्त कर्मचा-यांसाठी मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये वाहन लावण्यासाठी पार्किंगची सोय, सेवानिवृत्त कर्मचा-यांसाठी स्वतंत्र कक्ष याबाबत कार्यवाही करण्यासंबंधी विनंती केली. तसेच संघटनेच्या कार्यक्रमासाठी महानगरपालिकेच्यावतीने शहरात मध्यवर्ती ठिकाणी एखादी जागा मिळावी, असे मत त्यांनी व्यक्त केले.

# सत्यशोधक स्मृतींचा वाडा चिरेबंदी




**महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पुण्यात जिथे मुलींची पहिली शाळा सुरू केली, त्या भिडेवाडयाच्या जागी राष्ट्रीय स्मारक उभारण्याचा राज्य सरकारचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आता मार्गी लागणार आहे. या स्मारकात फुले दाम्पत्याच्या माणसावरच्या निर्वैर प्रेमाचं खरं रूप प्रतिबिंबित व्हावं, म्हणून काय करता येईल, याविषयी..**

एक वेडेंवांकडे चमत्कारिक पत्र अण्णासाहेबांच्या नांवावर आलें..पत्रांतला सर्व मजकूर मला उद्देशून होता. हें पत्र कोणीं लिहिलें असावें याची कल्पना मुळींच करवत नाहीं. आंत 'धर्मरक्षक' अशी सही केली आहे.. पत्र लिहिणाराच्या सूचनेप्रमाणें मी न वागल्यास मला मारण्याचा त्याचा विचार आहे.. पण असो. मला त्याबद्दल भीती बाळगण्यास नको. सर्वांचा पाठीराखा परमेश्वर माझ्याजवळ असतां विनाकारण मला इजा करण्यास कोण समर्थ होणार आहे?" आवडाबाई भिडे (१८६९-१८८८) हिनं तिच्या लहानशा आयुष्यात लिहिलेल्या दैनंदिनीमधली ही नोंद आहे. वयाच्या सतराव्या वर्षी वैधव्य आलेल्या आवडाबाईला पुण्यात शिकत असताना किती सामाजिक दबावाचा सामना करावा लागत होता आणि तरीही तिचं धैर्य किती अविचल होतं, याची कल्पना या नोंदीवरून येते. समाजात बदल घडवणं, स्त्री-शूद्रांच्या




शिक्षणासाठी प्रयत्न करणं या गोष्टींमुळे चिडलेल्या कर्मठांनी जोतिरावांवर मारेकरी घातले होते. त्याच कारणासाठी अनेक वर्षांनी आवडाबाईलाही अशी धमकी आली होती. आवडाबाईचे वडील रावबहादूर विष्णू मोरेश्वर भिडे इंग्रजी राज्य असूनही मोठया हुद्दयावर काम करणाऱ्या थोडया 'नेटिवां'पैकी एक होते. रत्नागिरी जिल्ह्याचे डेप्युटी कलेक्टर, फर्स्ट क्लास सबजज्ज अशा पदांवर त्यांनी काम केलं होतं. सुधारणा आणि स्त्रीशिक्षणाबद्दल त्यांना तरुणपणापासूनच आपुलकी होती. १८५२ मध्ये मुंबई इलाक्याचा गव्हर्नर लॉर्ड फॉकलंड याला जोतिराव फुले यांनी जो अर्ज केला होता, त्यावर केशव शिवराम जोशी, बापू रावजी मांडे, अण्णा सहस्रबुद्धे, जगन्नाथ सदाशिवजी आणि जोतिराव फुले यांच्याबरोबरीने पुण्यातल्या मुलींच्या शाळेच्या व्यवस्थापन मंडळीचे सदस्य म्हणून भिडे यांची सही होती. कालांतरानं जोतिरावांनी चालवलेल्या अस्पृश्यांच्या शाळेत शिक्षक म्हणूनही विष्णू मोरेश्वर आणि रामचंद्र मोरेश्वर अशी नावं दिसतात. मात्र हे भिडे आणि मुलींची शाळा सुरू करण्यासाठी १८४८ मध्ये बुधवार पेठेत ज्यांनी जागा दिली ते भिडे एकच नाहीत. बुधवार पेठेत (आजच्या फरासखाना पोलीस चौकीच्या आवारात) विश्राम रामजी घोले यांनी आपल्या लेकीच्या स्मरणार्थ उभारलेला बाहुलीचा हौद आहे. घोले यांच्या वाडयासमोर शंकरराव भिडे यांचा वाडा होता. त्यांनी किंवा त्यांचे दत्तक पुत्र रामचंद्र यांनी मुलींच्या शाळेसाठी पहिल्या मजल्यावर दोन खोल्यांची जागा उपलब्ध करून दिली होती आणि याच वाडयात दयानंद सरस्वतींची मिरवणूक संपल्यावर सभाही झाली होती. जोतिराव आणि सावित्रीबाई असे दोघंही याच शाळेत शिकवत असत, असा उल्लेख 'सुबोध पत्रिके'सारख्या समकालीन वृत्तपत्रात आला आहे. भिडेवाडयाची जीर्ण वास्तू इतिहासजमा करून तिथे आता स्त्री-शूद्रांच्या शिक्षणाची पायाभरणी करणाऱ्या विचारांचं स्मारक होईल अशी अपेक्षा आहे. या स्मारकातून आपल्याला नक्की कशाची आठवण जतन करायची आहे याबाबत स्पष्टता असायला हवी. समाजाच्या सर्व जातवर्गामधून आलेल्या माणसांनी आपापलं योगदान देऊन सत्यशोधनाचा आणि सार्वत्रिक शिक्षणाचा सुधारणावादी विचार अंगीकारला होता हे या स्मारकातून व्यक्त होणं गरजेचं आहे. 'धर्मरक्षक' अथवा इतर नावांनी वावरणाऱ्यांनी गेली दीडशे वर्ष सत्यशोधक विचारांची एक विपरीत प्रतिमा समाजात रुजवण्याचे प्रयत्न केले आहेत. १८८४ मध्ये अलिबागमधून प्रकाशित झालेल्या 'ब्रह्मद्वेष' नावाच्या पुस्तिकेमध्ये सत्यशोधक विचारांवर यथेच्छ टीका करून "ब्रह्मद्वेष हा कोणत्याही देशात व कोणत्याही काळी श्रेयस्कर होणार नाही," असं म्हटलं आहे. "साखरिलबाचे बीजापासून तज्जातीय झाड होणे जितकें संभवनीय व सुलभ आहे तितकें इडीला मसाला घालून होणार नाही. हाच प्रकार जाती संबंधाने.

## संपादकीय »

### गैरंटी'चे रखवाले!

***नवे चेहरे देणे नेहमीच प्रस्थापितांस सोयीचे. नव्या चेहऱ्यांस संधी दिली म्हणून मिरवताही येते आणि हे नवे उपकृततेच्या भावनेने बराच काळ प्रस्थापितांच्या कह्यात असतात..***

भाजपने मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थान या राज्यांत मुख्यमंत्री पदांवर निवडलेल्या व्यक्तींवर भाष्य करताना अनेकांनी त्याचे वर्णन 'पिढीबदल' (जनरेशन चेंज) असे केले. हा एक मुद्दा असू शकतो. पण त्यातून या बदलाचा अर्थ पूर्णपणे समजू शकत नाही. मध्य प्रदेशात मोहन यादव, राजस्थानात भजनलाल शर्मा आणि छत्तीसगडात विष्णुदेव साय या पूर्ण नव्या व्यक्तींस भाजपने मुख्यमंत्रीपदी बसवले. म्हणजे या राज्यांतील अनुक्रमे शिवराज सिंह चौहान, वसुंधराराजे शिंदे आणि डॉ. रमण सिंह यांची सद्दी भाजपने संपुष्टात आणली. तसे करताना हे सर्व नेते वयोवृद्ध होते आणि त्यांची जागा घेणारे तरणेबांड बहाद्दर आहेत असे अजिबात नाही. त्यामुळे नव्या, तरुण रक्तासाठी हा बदल भाजपने केला हे म्हणणे अयोग्य. उदाहरणार्थ मध्य प्रदेशाची सूत्रे ज्यांच्या हाती दिली गेली ते मोहन यादव ५८ वर्षांचे आहेत तर त्यांनी ज्यांची जागा घेतली .

**नव्या काश्मीर-नीतीची सुरुवात, इतिहासाच्या एका टप्प्याला पूर्णविराम देऊन दुसऱ्या टप्प्याची आशा, म्हणून 'अनुच्छेद ३७०'ला कायमची मूठमाती देणाऱ्या निकालाचे स्वागत आहेच, तरीही काही खुपते आहे, ते संघराज्य व्यवस्था आणि राज्यघटना-बदलाच्या प्रक्रियेबद्दल!**

## काश्मीरविषयक निकालांत खुपण्यासारखे काय?

अनुच्छेद ३७०' रद्द करण्याचा निर्णय वैध ठरवणारा निकाल हा मोदी सरकारसाठी मोठाच कायदेशीर विजय आहे आणि जम्मू-काश्मीरविषयी विद्यमान सरकारच्या भूमिकेलाही त्यामुळे वैधतेचे बळ मिळालेले आहे. याचा अर्थ असा की यापुढे केंद्र सरकार आणि जम्मू-काश्मीर यांच्या परस्परसंबंधांत प्रक्रियात्मक बाबींचा, इतिहासजमा झालेल्या आश्वासनांचा किंवा कायदेशीर किचकटपणाचाही अडसर राहणार नाही. या न्यायालयीन निकालाला लोक कसा प्रतिसाद देतील, हे आपला यापुढला राजकीय इतिहास कोणती वळणे घेतो यावरच अवलंबून राहील. मोदी सरकारचा हा निर्णय जम्मू-काश्मीरचा अवसानघातच करण्याचा आणखी एक प्रकार असून सर्वोच्च न्यायालयाने आता त्यावर मान्यतेची मोहोर उमटवली, असे यापुढे म्हणता येईल का? सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे संघराज्य व्यवस्थेसाठी घातक पायंडे पडण्याबाबतच्या, किंवा एकंदर अधिमान्यतेवरल्या विश्वासाला



तडे जाण्याबाबतच्या शंका खऱ्या ठरतील, की एका राज्याचे भारताच्या संविधानात्मक व्यवस्थेशी संपूर्ण तादात्म्य साधले जाण्याची अपेक्षा यातून पूर्ण होईल आणि 'अनुच्छेद ३७०' लागू असतानाच्या निर्णयांमधला, प्रशासनातला अर्धेमुर्धेपणा आता दूर होईल? खोरे सध्या शांत आहे. अगदी अबोल शांतता आहे तिथे. या चिडिचूप अवस्थेलाच अंतिम विजय समजले जाईल? की, न्या. संजय किशन कौल यांच्या निकालपत्रातील आगळया अपेक्षेनुसार, काश्मीरमध्ये झाले गेले विसरून 'सत्य आणि सलोखा' साधण्याच्या संधीची दारे उघडतील? काश्मीरचा इतिहास आणि आजवरचा अनुभव सरळसाधा नाही पण नीट पाहिल्यास हेही कबूल करावे लागेल की एवढे कागदोपत्री आश्वासन असूनही ते इतके निरर्थक ठरत राहण्याचा प्रकारही इथेच सतत घडत राहिला. बेइमानी, दुटप्पीपणा, सामान्यजनांचा विलाप आणि हिसा हाच इथला अनुभव ठरला. पाकिस्तानातून १९४७ सालच्या ज्या दिवशी काश्मीरच्या भूमीवर फौजा घुसल्या, तेव्हापासून इथे त्या त्या वेळचे राजकीय पर्याय आणि त्या त्या वेळी उपलब्ध असलेले कायदेशीर मार्ग यांच्या ओढाताणीत 'जमिनीवरचे वास्तव'सुद्धा सतत पालटत राहिले. 'अनुच्छेद ३७०'ने या प्रदेशाला संरक्षित राहण्याचे आणि स्वायत्ततेचे जे आश्वासन दिले होते, त्यापैकी संरक्षण पुरेसे मिळाले नाही आणि स्वायत्तता तर नाहीच नाही. काश्मीरमधल्या प्रादेशिक पक्षांच्या तऱ्हा, वेळोवेळी केंद्रात असलेल्या सरकारांनी केलेली हडेलहप्पी, दहशत फैलावण्याचे आणि फुटीरतावाद पेरण्याचे पाकिस्तानी प्रयत्न यांचा परिणाम असा की काश्मीरमध्ये लोकशाहीदेखील नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आधीच माकड आणि त्यात बेवडा!

## छगन भुजबळांची मनोज जरांगेंवर बोचरी टीका

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणासाठी आक्रमक झाले आहेत. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावं, या मागणीवर मनोज जरांगे ठाम आहेत. शिवाय २४ डिसेंबरच्या आधीच सरकारने मराठा आरक्षणावर निर्णय घ्यावा, त्यानंतर एक तासही वाढवून देणार नाही, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. मनोज जरांगेंच्या इशाऱ्यानंतर ओबीसी नेते आणि अन्न तथा नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनीही आक्रमक पवित्रा घेतला आहे. ते भिवंडी येथील ओबीसी मेळाव्यात बोलत होते.**



भिवंडी येथे पार पडलेल्या ओबीसी मेळाव्यातून छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे पाटलांवर जोरदार हल्लाबोल केला. भुजबळांनी जरांगेंचा एकेरी उल्लेख करत त्यांची तुलना मद्यपींशी केली. आधीच माकड त्यात बेवडा प्यायलेला, अशा अर्थाच्या म्हणीचा वापर करत भुजबळांनी टीकास्त्र सोडलं. यावेळी छगन भुजबळ म्हणाले, "हा जरांगे आमची लायकी काढतो. तो काहीही बोलतो. तो मला म्हणतो, हा 'येवल्याचा येडपाट' आहे. आता याला काय सांगायचं? एक म्हण आहे, आधीच मर्कट आणि त्यात मद्य प्यायलेला.. म्हणजे आधीच माकड आणि त्यात बेवडा प्यायलेला... जरांगे काहीही बोलतो. अरे आमची लायकी तू काय पाहतो?" मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण देण्याला आमचा विरोध नाही. आमचा विरोध झुंडशाही आणि दादागिरीला आहे. आरक्षण म्हणजे गरीबी हटाव मोहीम नाही. सध्या ओबीसी प्रवर्गात वाटेकरी येऊ लागले आहेत. राज्यात सध्या ओबीसींमधून आरक्षण द्या, असा अट्टहास सुरू आहे. खोटे कुणबी दाखले दणादण दिले जात आहेत, असा आरोपही छगन भुजबळांनी केला. अन्न तथा नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी भिवंडी येथील ओबीसी मेळाव्यातून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडलं आहे. भुजबळांनी जरांगेंचा एकेरी उल्लेख करत त्यांची तुलना मद्यपींशी केली. दारू पिऊन मनोज जरांगेंच्या किडन्या खराब झाल्या आहेत. आधीच माकड त्यात बेवडा प्यायलेला, अशा अर्थाच्या म्हणीचा वापर करत भुजबळांनी टीकास्त्र सोडलं. यावर मनोज जरांगे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. जन्मापासून आतापर्यंत माझ्या शरीराला दारुचा स्पर्श जरी झाला असेल तर मी जिवंत समाधी घेतो अन्यथा भुजबळांनी जिवंत समाधी घ्यावी, असं आव्हान जरांगे पाटील यांनी दिलं आहे. ते 'टीव्ही ९ मराठी'शी बोलत होते. छगन भुजबळांनी केलेल्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना मनोज जरांगे म्हणाले, "यामुळेच मी त्याला (छगन भुजबळ) येडपट म्हणतो. खास येडपट म्हणता. तो येवल्यात बसून सासुच्या घरचं खातो, म्हणूनच मी त्याला येडपट म्हणतो. मी त्याला जाहीर आव्हान करतो की, माझी नार्को टेस्ट करा. जन्मापासून आतापर्यंत माझ्या अंगाला दारूचा स्पर्श जरी झाला असेल तर मी जिवंत समाधी घेतो. नाहीतर त्यांनी तरी जिवंत समाधी घ्यावी. हे मी अत्यंत जबाबदारीने बोलत आहे. त्यामुळे तू काहीही बोलू नको, मापात राहा." रविवारी भिवंडी येथे पार पडलेल्या ओबीसी मेळाव्यातून छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे पाटलांवर जोरदार हल्लाबोल केला. जरांगेंचा एकेरी उल्लेख करत त्यांची तुलना मद्यपींशी केली. आधीच माकड त्यात बेवडा प्यायलेला, अशा अर्थाच्या म्हणीचा वापर करत भुजबळांनी टीकास्त्र सोडलं.

### तो प्रचंड जातीवादी

छगन भुजबळांना उद्देशून मनोज जरांगे पुढे म्हणाले, "तो प्रचंड जातीवादी आहे. तो मुर्खांचा मुकादम आहे. तो महामूर्ख माणूस आहे. त्यामुळेच मी त्याला येडपट म्हणतो. माझ्या शरीराला जन्मापासून दारुचा डागही नाही. हे शरीर जनतेसाठी लढून असं झालं आहे. तुझ्यासारखं लोकांचं रक्त पिऊन शरीर वाढलं नाही आणि माकड काय करू शकतं? ते जरा रावणाला विचार. तुझी लंकाही जळेल, जरा नीट राहा." मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणासाठी आक्रमक झाले आहेत. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावं, या मागणीवर मनोज जरांगे ठाम आहेत. शिवाय २४ डिसेंबरच्या आधीच सरकारने मराठा आरक्षणावर निर्णय घ्यावा, त्यानंतर एक तासही वाढवून देणार नाही, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. मनोज जरांगेंच्या इशाऱ्यानंतर ओबीसी नेते आणि अन्न तथा नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनीही आक्रमक पवित्रा घेतला आहे. ते भिवंडी येथील ओबीसी मेळाव्यात बोलत होते. रविवारी (१७ डिसेंबर) भिवंडी येथे पार पडलेल्या ओबीसी मेळाव्यातून छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे पाटलांवर जोरदार हल्लाबोल केला. भुजबळांनी जरांगेंचा एकेरी उल्लेख करत त्यांची तुलना मद्यपींशी केली. आधीच माकड त्यात बेवडा प्यायलेला, अशा अर्थाच्या म्हणीचा वापर करत भुजबळांनी टीकास्त्र सोडलं. यावेळी छगन भुजबळ म्हणाले, "हा जरांगे आमची लायकी काढतो. तो काहीही बोलतो. तो मला म्हणतो, हा 'येवल्याचा येडपाट' आहे.

# एकनाथ खडसेंनी पक्षात राहून चोऱ्या केल्या

## आर्थिक घोटाळे केले; गिरीश महाजनांची टीका

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**सलीम कुट्टावरून राज्यातील वातावरण तापलं आहे. अशात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, आमदार एकनाथ खडसे यांनी मंत्री गिरीश महाजन यांना सलीम कुट्टावरून लक्ष्य केलं आहे. "माझ्यावर आरोप झाले, तेव्हा पक्षानं माझा राजीनामा घेतला होता. आता फोटोच्या माध्यमातून गिरीश महाजनांचा सलीम कुट्टाशी संबंध दिसत आहे.अशी मागणी खडसेंनी केली होती. याला गिरीश महाजनांनी प्रत्युत्तर दिलं आहे.**



तथ्य नसताना सुद्धा माझ्यावर दाऊदच्या बायकोबरोबर संभाषण झाल्याचा आक्षेप घेण्यात आला होता. त्यानंतर माझी चौकशी करण्यात आली होती. आता फोटोच्या माध्यमातून गिरीश महाजनांचा सलीम कुट्टाशी संबंध दिसत आहे. देशद्रोहींशी गिरीश महाजनांचा सरळ संबंध आहे का?" असा सवाल खडसेंनी उपस्थित केला. माझ्यावर आरोप झाल्यावर पक्षानं माझा राजीनामा घेतला होता. आता गिरीश महाजनांवर देशद्रोहाचे आरोप होत आहेत. ते पुराव्यानिशी समोर देखील येत आहेत. त्यामुळे मंत्रिमंडळात असताना गिरीश महाजनांची चौकशी कशी होऊ शकेल? गिरीश महाजनांनी मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा. पण, भाजपाच्या भूमिकेप्रमाणे गिरीश महाजनही वॉशिंगमशीन मधून स्वच्छ होऊन बाहेर येतात की काय," असा टोलाही खडसेंनी लगावला आहे.

### खडसेंच्या सगळ्या मालमत्तेवर जप्ती

यावर बोलताना गिरीश महाजन म्हणाले, "दाऊदचा आरोप झाल्यानं खडसेंचा राजीनामा घेतला नाही. तर, पक्षात राहून चोऱ्या केल्या, आर्थिक घोटाळे केले म्हणून खडसेंना काढून टाकण्यात आलं. एकनाथ खडसे वैफल्यग्रस्त झाले आहेत. भोसरी एमआयडीची प्रकरणात खडसेंच्या सगळ्या मालमत्तेवर जप्ती आणली आहे. ८४ एकरमधील सगळा मुरूमही खडसेंनी विकून टाकला आहे. याप्रकरणी एसआयटी नेमली असून, १३७ कोटींचा दंड खडसेंना झाला आहे. आता एकनाथ खडसेंची परिस्थिती केविलवाणी झाली आहे. त्यामुळे खडसेंना काय बोलावं-काय बोलू नये हे कळत नाही. म्हणून ते बेछूट आरोप करत आहेत. खडसेंच्या आरोपांना किंमत देत नाही," अशी टीका गिरीश महाजनांनी केली आहे.

# गुजरातची प्रगती तर देशाची प्रगती होईल!

## » सूरत डायमंड बोर्सच्या उद्घाटनात पंतप्रधानांचे वक्तव्य

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**जगातील सर्वात मोठं कार्यलय असलेल्या सूरत डायमंड बोर्सचे आज (१७ डिसेंबर) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झालं. गेल्या काही वर्षांत सूरत हे नवे व्यापारी पेठ म्हणून उदयाला येत आहे. त्यामुळे येथे आता सराफा बाजार केंद्र निर्माण करण्याच्या उद्देशाने सूरत डायमंड बोर्स तयार करण्यात आलं आहे. यामुळे देशाला जागतिक स्तरावर हिरे व्यापार करण्यास संधी मिळेल, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. सूरत डायमंड बोर्सचे उद्घाटन झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जमलेल्या जनतेशी संवाद साधला.**



जागतिक अर्थव्यवस्थेत भारत नक्कीच तिसऱ्या क्रमांकावर जाणार आहे. सरकारने येणाऱ्या २५ वर्षांचं लक्ष्य ठरवलं आहे. ५ ट्रिलिअन डॉलर आणि १० ट्रलिअन डॉलर अर्थव्यवस्थेसाठी काम केलं जात आहे. आम्ही देशाच्या एक्स्पोर्टलाही रेकॉर्ड उंचीवर घेऊन जाण्यासाठी काम करत आहोत. यात सूरतच्या डायमंड इंडस्ट्रीची जबाबदारी वाढली आहे", असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. सूरत शहरालाही टार्गेट ठरवलं पाहिजे. देशाच्या प्रगतीत सूरतची भागिदारी कशी वाढेल, हे सूरतने आता ठरवलं पाहिजे. डायमंड सेक्टर जेम्स आणि ज्वेलर्ससाठी आव्हानही आहे आणि संधीही आहे. डायमंड ज्वेलरी एक्स्पोर्टमध्ये भारत पुढे आहे. सिल्वर कट डायमंडमध्येही आपण अग्रणी आहोत. जगातील एकूण एक्स्पोर्टमध्ये भारताची टक्केवारी फक्त साडेतीन टक्के आहे. सूरतने ठरवलं तर जेम्स आणि ज्वेलरी एक्स्पोर्टमध्ये आपण डबल डिजिटमध्ये येऊ शकतो", असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला. मी गॅरंटी देतो की तुमच्या प्रत्येक प्रयत्नात सरकार तुमच्यासोबत आहे. आम्ही सुरुवातीपासूनच या सेक्टरला एक्स्पोर्ट प्रमोशनसाठी फोकस एरिआ ठरवलं आहे. अनेक प्रयत्न केंद्र सरकार करत आहे. आपल्या या प्रयत्नांचा जास्तीत जास्त फायदा उठवायचा आहे.

आज आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा बोलबाला आहे. जगभर भारताची चर्चा आहे", असं मोदी म्हणाले. तुम्हा सर्वांचं सामर्थ्य वाढवण्यासाठी सरकार सूरतचं सामर्थ्य वाढवत आहे. आमचं सरकार सूरतमध्ये आधुनिक पायाभूत सुविधांसाठी विशेष प्रयत्न करत आहे. आज सूरतमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचं विमानतळ आहे. सूरतमध्ये मेट्रो रेल्वे सेवा आहे. सूरत पोर्टमध्ये अनेक महत्त्वाच्या उत्पादनांची एक्स्पोर्टसाठी बंदर आहे, सूरत सातत्याने आंतरराष्ट्रीय व्यापारी केंद्राशी जोडलं जातंय. अशी आंतरराष्ट्रीय कनेक्टिव्हिटी जगातील फार कमी शहरात असं आहे. सूरतला बुलेट ट्रेन प्रकल्पाशीही जोडलं आहे. वेस्टर्न डेडिकेट फ्रेट कॉरिडॉरवरही काम सुरू आहे. यामुळे, उत्तर-पूर्व भारतपर्यंत सूरतची रेल कनेक्टिव्हीट सशक्त होईल. अशी आधुनिक कनेक्टिव्हिटी असणारा सूरत देशाचं एकमेव शहर आहे. याचा जास्तीत जास्त लाभ उठवा. सूरतची प्रगती झाली तर गुजरातची प्रगती होईल आणि गुजरातची प्रगती झाली तर माझ्या देशाची प्रगती होईल", असंही मोदी म्हणाले. सूरत शहरालाही टार्गेट ठरवलं पाहिजे. देशाच्या प्रगतीत सूरतची भागिदारी कशी वाढेल, हे सूरतने आता ठरवलं पाहिजे. डायमंड सेक्टर जेम्स आणि ज्वेलर्ससाठी आव्हानही आहे आणि संधीही आहे. डायमंड ज्वेलरी एक्स्पोर्टमध्ये भारत पुढे आहे. सिल्वर कट डायमंडमध्येही आपण अग्रणी आहोत. जगातील एकूण एक्स्पोर्टमध्ये भारताची टक्केवारी फक्त साडेतीन टक्के आहे. सूरतने ठरवलं तर जेम्स आणि ज्वेलरी एक्स्पोर्टमध्ये आपण डबल डिजिटमध्ये येऊ शकतो", असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला. जागतिक अर्थव्यवस्थेत भारत नक्कीच तिसऱ्या क्रमांकावर जाणार आहे. सरकारने येणाऱ्या २५ वर्षांचं लक्ष्य ठरवलं आहे. ५ ट्रिलिअन डॉलर आणि १० ट्रलिअन डॉलर अर्थव्यवस्थेसाठी काम केलं जात आहे. आम्ही देशाच्या एक्स्पोर्टलाही रेकॉर्ड उंचीवर घेऊन जाण्यासाठी काम करत आहोत. यात सूरतच्या डायमंड इंडस्ट्रीची जबाबदारी वाढली आहे", असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. सूरत शहरालाही टार्गेट ठरवलं पाहिजे. देशाच्या प्रगतीत सूरतची भागिदारी कशी वाढेल, हे सूरतने आता ठरवलं पाहिजे. डायमंड सेक्टर जेम्स आणि ज्वेलर्ससाठी आव्हानही आहे आणि संधीही आहे. डायमंड ज्वेलरी एक्स्पोर्टमध्ये भारत पुढे आहे. सिल्वर कट डायमंडमध्येही आपण अग्रणी आहोत.

### सूरतने टार्गेट ठरवावं

» सूरत शहरालाही टार्गेट ठरवलं पाहिजे. देशाच्या प्रगतीत सूरतची भागिदारी कशी वाढेल, हे सूरतने आता ठरवलं पाहिजे. डायमंड सेक्टर जेम्स आणि ज्वेलर्ससाठी आव्हानही आहे आणि संधीही आहे. डायमंड ज्वेलरी एक्स्पोर्टमध्ये भारत पुढे आहे. सिल्वर कट डायमंडमध्येही आपण अग्रणी आहोत. जगातील एकूण एक्स्पोर्टमध्ये भारताची टक्केवारी फक्त साडेतीन टक्के आहे. सूरतने ठरवलं तर जेम्स आणि ज्वेलरी एक्स्पोर्टमध्ये आपण डबल डिजिटमध्ये येऊ शकतो", असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# महिलांना पुरुषांपेक्षा कमी पगार

## » गृहिणींना घरकामाचा मोबदला मिळत नाही

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**भारताचे सरन्यायाधीश डी वाय चंद्रचूड (CHIEF JUSTICE DY CHANDRACHUD) यांनी पुरुष आणि महिलांच्या पगारातील तफावत आणि महिलांच्या हक्कांबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. महिलांना पुरुषांपेक्षा कमी पगार मिळतो असं वक्तव्य सरन्यायाधीश डी वाय चंद्रचूड यांनी केलं. बंगळुरू येथील नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया युनिव्हर्सिटीमध्ये आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते.**



भारतात महिला आणि पुरुष यांच्या पगारातील तफावतीवर बोलताना चंद्रचूड म्हणाले की, हा मुद्दा भारतीय महिलांसाठी विशेषतः ठळक आहे, विशेषत: उपेक्षित असलेल्या महिलांसाठी. विविध व्यावसायिक क्षेत्रात महिलांचे महत्त्वपूर्ण योगदान असूनही, त्यांना अजूनही पुरुषांच्या तुलनेत कमी पगार मिळत असल्याचे चंद्रचूड म्हणाले. सरन्यायाधीश चंद्रचूड म्हणाले की, घर हे गृहिणीसाठी आर्थिक घडामोडींचे ठिकाण आहे. जिथे तिला तिच्या सेवेसाठी वेतन दिले जात नाही. त्याचवेळी, महिलांना सार्वजनिक ठिकाणी विशिष्ट सेवा आणि व्यवसायांसाठी मर्यादित केले जाते. अशा प्रकारे त्यांच्या अधिकारांचे उल्लंघन होत असल्याचे चंद्रचूड म्हणाले. भारताचे 19 वे सरन्यायाधीश ईएस वेंकटरामय्या यांच्या स्मरणार्थ आयोजित कार्यक्रमाला संबोधित करताना सरन्यायाधीश म्हणाले की कायद्याचा उद्देश सार्वजनिक आणि खासगी दोन्ही ठिकाणी विस्तारित केला पाहिजे. भारतीय दंड संहितेत अशी तरतूद आहे की जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती भांडतात आणि सार्वजनिक शांतता बिघडवतात तेव्हा तो गुन्हा मानला जातो. परंतु जेव्हा हाणामारी सार्वजनिक ठिकाणी होते तेव्हाच तो दंडनीय आहे. अशा परिस्थितीत, कायद्याचा भर केवळ वादांच्या गुणवत्तेवर आणि तोटेवर नाही, तर तो कुठे होत आहे यावर आहे. समाजाने आपल्याला शिकवलेल्या कल्पनेच्या पलीकडे आपले मन मोकळे करण्यास आपण तयार आणि इच्छुक असतो.

# 600 रुपयांत LPG सिलेंडर

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

दिवसेंदिवस वाढणाऱ्या महागाईनं (INFLATION) सर्वसामान्यांच्या नाकी नऊ आणले आहेत. अशातच संसदेच्या हिवाळी अधिवेशनात (WINTER SESSION OF PARLIAMENT) महत्त्वाची माहिती देताना केंद्रीय मंत्री हरदीप सिंह पुरी (UNION MINISTER HARDEEP SINGH PURI) एलपीजीबाबत (LPG GAS CYLINDER) सांगितलेल्या आकडेवारीनं नक्कीच अनेकांना दिलासा मिळाल्याचं पाहायला मिळत आहे. संसदेत नेमकं काय म्हणाले केंद्रीय मंत्री हरदीप सिंह पुरी जाणून घेऊयात सविस्तर... केंद्रीय मंत्री हरदीप सिंह पुरी (HARDEEP SINGH PURI) यांनी संसदेत महत्त्वाची माहिती देताना सांगितलं की, गरीब कुटुंबांना स्वस्त दरांत एलपीजी गॅस सिलेंडर (LPG GAS CYLINDER) उपलब्ध करून देण्यात सरकार इतर देशांच्या तुलनेत प्रभावी ठरलं आहे. शेजारील देश पाकिस्तान (PAKISTAN), नेपाळ (NEPAL) आणि श्रीलंका (SRI LANKA) येथे एलपीजीच्या किमती (LPG PRICES) भारतापेक्षा खूप जास्त आहेत. दरम्यान, केंद्रीय मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी संसदेत एका प्रश्नाला उत्तर देताना एलपीजीच्या वापराबाबतही माहिती दिली. पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी सांगितलं की, पंतप्रधान उज्ज्वला योजनेअंतर्गत (PMUY) एलपीजीचा सरासरी दरडोई वापर एप्रिल-ऑक्टोबरमध्ये 3.8 सिलेंडर रिफिल झाला आहे, जो 2019-20 या वर्षात 3.01 सिलेंडर रिफिल होता. आणि या काळात आर्थिक वर्ष 2022-23 ते 3.71 होतं.

# 'सालार' पेक्षाही भयंकर असलेल्या 'बघीरा'चा टीझर

सध्या 'सालार' सिनेमाची सगळीकडे उत्सुकता आहे. प्रभास या सिनेमात प्रमुख भूमिकेत आहे. सालारची सध्या सगळीकडे क्रेझ आहे. प्रभासचे चाहते सालार पाहण्यासाठी आत्तापासूनच उत्सुक आहेत. अशातच 'केजीएफ', 'कांतारा' आणि 'सालार'ला टक्कर द्यायला आणखी एक सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येतोय. तो म्हणजे 'बघीरा'. बघीराचा टीझर आज भेटीला आलाय. होमबेल फिल्म्सने सालारच्या भव्य रिलीजपुर्वी बघीरा या आगामी रोमांचक सिनेमाच्या टीझरचे अनावरण केले आहे. या सिनेमात साऊथ सुपरस्टार श्री मुरली झळकणार आहे. आज मुरलीच्या वाढदिवसानिमित्त, होमबेल फिल्म्सने सोशल मीडियावर "बघीरा" चा 1 मिनिट 26 सेकंदाचा ॲक्शन-पॅक टीझर रिलीज केला. बघीराच्या टीझरमध्ये आपल्याला एका अंधारमय जगाची झलक दिसते.

एका शहरात मुलींवर आणि सामान्य नागरिकांवर अन्याय होत असलेला दिसतोय. यावेळी गुंडांपासून शहराला वाचवण्यासाठी एक तरुण बघीराचा कपडा लावून गुंडांशी सामना करण्यास सज्ज आहे. केजीएफ, सालारप्रमाणे बघीरा सुद्धा भव्य आणि रोमांचक असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. विशेष गोष्ट म्हणजे, केजीएफ चाप्टर 1 आणि केजीएफ 2 चे लेखक - दिग्दर्शक प्रशांत नील यांनी 'बघीरा'चं लेखन केलंय. बघीरा या आगामी सिनेमात श्रीमुरली, रुक्मिणी वसंत, प्रकाश राज, रंगायना रघू, अच्युत ठाकूर, गरुडा राम असे कलाकार झळकणार आहेत. या सिनेमाची रिलीज डेट अजुन समोर आली नाही. तरीही हा सिनेमा पुढच्या वर्षी २०२४ ला प्रेक्षकांच्या भेटीला येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# इन्फ्लुएन्सर प्रिया सिंग नक्की आहे तरी कोण?

प्रिया सिंग हे नाव गेल्या अनेक दिवसांपासून सोशल मीडियावर चर्चेत आहे. तिच्या इन्स्टाग्राम पोस्टद्वारे तिने तिचा प्रियकर आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे (MSRDC) अनिल गायकवाड यांचा मुलगा अश्वजित गायकवाडवर कारने चिरडून हत्या करण्याचा आरोप केला आहे. कोण आहे प्रिया सिंग? जाणून घ्या. प्रिया सिंग ही इन्फ्लुएन्सर आहे. प्रिया ही रील्सच्या माध्यमातून सोशल मीडियावर सक्रीय असते. याशिवाय ती फॅशन आणि फिटनेस एक्सपर्ट आहे. ती कंटेट क्रिएशनच्या माध्यमातून सोशल मीडियावर विविध ब्रँडचं प्रमोशन करत असते प्रियाचे इन्स्टाग्रामवर १ मिलियनपेक्षा जास्त फॉलोवर्स आहेत. प्रियाने इंस्टाग्रामवर काही फोटो पोस्ट केले आहेत, ज्यामध्ये तिच्या शरीरावर अनेक जखमांच्या खुणा दिसत आहेत आणि ती सध्या रुग्णालयात दाखल आहे.


रिपोर्ट्सनुसार, प्रिया गेल्या 4 वर्षांपासून अश्वजीतसोबत रिलेशनशिपमध्ये होती. मात्र तिचे म्हणणे आहे की, अश्वजीत गायकवाडचे लग्न झाले होते. त्याच्या लग्नाला ४ वर्ष झाले होती. मात्र ही गोष्ट त्याने तिच्यापासून लपवून ठेवली. जेव्हा प्रियाला माहिती मिळाली तेव्हा गायकवाडने तिच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, असं प्रियाचं म्हणणं आहे. प्रियाने तिच्या सोशल मीडिया पोस्टद्वारे तिला न्याय मिळावा असे आवाहन केले आहे. तिच्या पोस्टमध्ये तिने सांगितले आहे की, तिच्या प्रियकराने तिच्यावर कार चालवली आणि तिला मरण्यासाठी रस्त्यावर एकटी सोडले.

# सई लोकूरला कन्यारत्न



मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री सई लोकूर आई झाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासुन सईचे प्रेग्नंसी फोटोशूट चर्चेत होते. आता नुकतंच सईने सोशल मीडियावर आई झाल्याची गुड न्यूज सर्वांसोबत शेअर केलीय. सईला कन्यारत्न प्राप्त झाले असून आज १७ फेब्रुवारीला सईने मुलीला जन्म दिलाय. बाळ सुदृढ, सुंदर असुन ती जन्माला येताच अनेकांचं तिला प्रेम मिळालंय. या काळात तुम्ही आमच्यावर जो प्रेमाचा वर्षाव केला आणि पाठिंबा दिला, त्याबद्दल मी ऋणी आहे. आम्ही खुप आनंदात आहे. आई - बाबा झालेले सई - तीर्थदीप. सई लोकूरच्या सोशल मीडिया टीमने पोस्ट केलीय की, "एका छोट्या चेहऱ्यावर देवाचा आशिर्वाद. आमच्या बाळाच्या आगमनाची घोषणा करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. आई आणि बाळ दोघेही ठीक आहेत. सर्व प्रेम आणि शुभेच्छांसाठी धन्यवाद." अशी पोस्ट सईच्या सोशल मीडिया टीमने शेअर केलीय. सईला कन्यारत्न प्राप्त झाल्याबद्दल अनेक कलाकारांनी आणि तिच्या चाहत्यांनी कमेंटमध्ये तिचं अभिनंदन केलंय. दरम्यान सईला मुलगी झाल्याने तिचा काही दिवसांपुर्वीचा व्हिडिओ चर्चेत आलाय. सई लोकूरने सोशल मीडियावर डोहाळेजेवणाचा व्हिडिओ शेअर केला होता. त्यावेळी सईच्या समोर दोन वाट्या ठेवल्या होत्या. एका वाटीत गुलाबजाम असतो तर दुसऱ्या वाटीत खीर होती. सईने त्यावेळी जी वाटी उचलली त्यात खीर होती. आणि आज सईला मुलगी झाल्याने असा योगायोग जुळून आलाय.

# आयुष शर्मा सुदैवाने बचावला!



मनोरंजन विश्वातून एक मोठी बातमी समोर येतेय. बॉलिवूड सुपरस्टार सलमान खानचा भाऊजी आयुष शर्माच्या गाडीला अपघात झाल्याची घटना घडलीय. आयुषच्या गाडीचा मुंबईत अपघात झाला. पण चांगली गोष्ट म्हणजे, अपघाताच्या वेळी आयुष कारमध्ये उपस्थित नव्हता. त्यामुळे मोठी घटना टळलीय. मिळालेल्या माहितीनुसार, अपघातावेळी कारमध्ये फक्त आयुष शर्माचा ड्रायव्हर उपस्थित होता. तो कार घेऊन मुंबईतील गॅस स्टेशनकडे जात असताना दुचाकी चालकाने आयुषच्या कारला धडक दिली. धडक देणारा दुचाकीस्वार मद्यधुंद अवस्थेत होता, असं समजतंय. अद्याप या अपघातात कोणी जखमी झाल्याची माहिती समोर आलेली नाही. या कार अपघाताबाबत आयुष शर्मा किंवा सलमान खानकडून कोणतेही वक्तव्य आलेले नाही. आयुष शर्मने या वर्षी ऑक्टोबरमध्ये इंडस्ट्रीत काम करून पाच वर्षे पूर्ण केली. आपल्या पाच वर्षांच्या कारकिर्दीत या अभिनेत्याने फार कमी चित्रपटांमध्ये काम केले आहे, परंतु आपल्या प्रत्येक चित्रपटातून त्यांनी एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्याने आपल्या करिअरची सुरुवात 'लवयात्री' या चित्रपटातून केली होती. यानंतर तो सलमान खानसोबत 'अंतिम' या चित्रपटात दिसला होता. आता तो त्याच्या आगामी 'रुस्लान' चित्रपटात झळकणार आहे. हा चित्रपट 12 जानेवारी 2024 रोजी थिएटरमध्ये दाखल होणार आहे.

मनोरंजन विश्वातून एक मोठी बातमी समोर येतेय. बॉलिवूड सुपरस्टार सलमान खानचा भाऊजी आयुष शर्माच्या गाडीला अपघात झाल्याची घटना घडलीय. आयुषच्या गाडीचा मुंबईत अपघात झाला. पण चांगली गोष्ट म्हणजे, अपघाताच्या वेळी आयुष कारमध्ये उपस्थित नव्हता. त्यामुळे मोठी घटना टळलीय. मिळालेल्या माहितीनुसार, अपघातावेळी कारमध्ये फक्त आयुष शर्माचा ड्रायव्हर उपस्थित होता. तो कार घेऊन मुंबईतील गॅस स्टेशनकडे जात असताना दुचाकी चालकाने आयुषच्या कारला धडक दिली. धडक देणारा दुचाकीस्वार मद्यधुंद अवस्थेत होता, असं समजतंय. अद्याप या अपघातात कोणी जखमी झाल्याची माहिती समोर आलेली नाही.

# 'ॲनिमल'च्या कलाकारांनी फॅनची इच्छा केली पूर्ण

ॲनिमल' चित्रपटाच्या स्टार कास्टचा व्हिडिओ गीता छेत्री या सोशल मीडिया यूजरने इन्स्टाग्राम अकाउंटवरून शेअर केला आहे. व्हिडिओमध्ये आपण पाहू शकतो की, अभिनेता रणबीर कपूर 'फ्लाइट अटेंडंट' गीताच्या शर्टवर मागील बाजूने ऑटोग्राफ देत आहे. त्याचवेळी 'लॉर्ड बॉबी' या नावाने प्रसिद्ध असलेला अभिनेता बॉबी देओल गीताशी हशामस्करी करत तिच्या खांद्यावर ऑटोग्राफ देत आहे. 'ॲनिमल' चित्रपटाची लीड रश्मिका मंदान्ना देखील फ्लाइटमध्ये उपस्थित होती. तिनेही गीताच्या शर्टवर तिचा ऑटोग्राफही दिला. बॉक्स ऑफिसवर आलेल्या माहितीनुसार या चित्रपटानं आतापर्यंत पूर्ण जगभरातून ७७२.३३ कोटींची कमाई केल्याचे दिसून आले आहे. 'ॲनिमल'ने आतापर्यंत आठशे कोटींचा टप्पा पार केल्याचं बोलले जात आहे. येत्या आठवड्यात 'ॲनिमल' चित्रपट आणखी मोठी मजल मारेल असा अंदाज व्यक्त केला जात आहे. प्रदर्शित झाल्यापासून 'ॲनिमल'च्या वाट्याला तुफान प्रतिसाद मिळतो आहे.




ॲनिमलच्या स्टारकास्ट विषयी बोलायचे झाल्यास त्यामध्ये रणबीर कपूर, बॉबी देओल, रश्मिका मंदाना, अनिल कपूर, शक्ती कपूर, तृप्ती डिमरी, सौरभ सचदेव, प्रेम चोप्रा आणि सुरेश ऑबेरॉय यांच्या महत्वाच्या भूमिका आहे. संदीर रेड्डी वांगानं या चित्रपटाचे दिग्दर्शन केले असून त्यानं यापूर्वी कबीर सिंग आणि अर्जून रेड्डी नावाच्या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे.ॲनिमल' चित्रपटाच्या स्टार कास्टचा व्हिडिओ गीता छेत्री या सोशल मीडिया यूजरने इन्स्टाग्राम अकाउंटवरून शेअर केला आहे. व्हिडिओमध्ये आपण पाहू शकतो की, अभिनेता रणबीर कपूर 'फ्लाइट अटेंडंट' गीताच्या शर्टवर मागील बाजूने ऑटोग्राफ देत आहे. त्याचवेळी 'लॉर्ड बॉबी' या नावाने प्रसिद्ध असलेला अभिनेता बॉबी देओल गीताशी हशामस्करी करत तिच्या खांद्यावर ऑटोग्राफ देत आहे. 'ॲनिमल' चित्रपटाची लीड रश्मिका मंदान्ना देखील फ्लाइटमध्ये उपस्थित होती.

# कसोटीच्या गुणतालिकेत भारत अव्वल!

## » पाकिस्तानच्या पराभवाचा इंडियाला झाला फायदा

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने पर्थमध्ये पाकिस्तानचा ३६० धावांनी पराभव केला. कांगारूंच्या या विजयाचा भारतीय संघाला फायदा झाला आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत टीम इंडिया अव्वल स्थानावर पोहोचली आहे. टीम इंडियाने पाकिस्तानला मागे टाकत अव्वल स्थान पटकावले आहे. दोघांचे गुण आणि टक्केवारी जरी समान असली तरी टीम इंडियाचा पराभव झालेला नाही. त्यामुळे भारत पाकिस्तानच्या एक स्थान वर पहिल्या क्रमांकावर आहे.**





दुसरीकडे, ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पराभवामुळे पाकिस्तान संघ दुसऱ्या स्थानावर घसरला आहे. ऑस्ट्रेलिया पाचव्या स्थानावर आहे. सध्याची जागतिक कसोटी चॅम्पियनशिप २०२३-२५ आवृत्तीचा भाग आहे. त्याचा अंतिम सामना २०२५मध्ये खेळवला जाईल. गुणांच्या टक्केवारीनुसार अव्वल दोन क्रमांकाचे संघ अंतिम फेरीत खेळतील. मात्र, हे अद्याप प्रारंभिक टप्पे आहेत आणि भविष्यात बरेच बदल दिसून येतील. पर्थ कसोटी सुरू होण्यापूर्वी पाकिस्तानची गुण आणि टक्केवारी १०० होती. आता पहिल्याच कसोटीतील पराभवानंतर त्याच्या गुणांची टक्केवारी ६६.६७ वर घसरली आहे. या काळात पाकिस्तानी संघाने दोन मालिकांमध्ये तीन कसोटी सामने खेळले आहेत. त्यांनी श्रीलंकेविरुद्धच्या दोन कसोटी जिंकल्या होत्या. त्याचवेळी आता ऑस्ट्रेलियाविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला आहे. संघाचे दोन विजय आणि एक पराभवासह २४ गुण आहेत. त्याच वेळी, भारतीय संघ आता दोन कसोटी सामने (वेस्ट इंडिज) खेळला आहे. टीम इंडियाने एक जिंकला आहे तर दुसरा ड्रॉ राहिला आहे. अशा स्थितीत भारतीय संघाच्या नावावर एकही पराभव नाही. टीम इंडिया १६ गुण आणि ६६.६७ पॉइंट टक्केवारीसह अव्वल स्थानावर आहे. न्यूझीलंडची पॉइंट टक्केवारी ५० आहे आणि ती तिसऱ्या स्थानावर आहे. त्याचबरोबर बांगलादेशचा संघ केवळ ५० गुणांच्या टक्केवारीसह चौथ्या स्थानावर आहे. ऑस्ट्रेलिया ४१.६७ गुणांच्या टक्केवारीसह पाचव्या तर वेस्ट इंडिज १६.६७ गुणांच्या टक्केवारीसह सहाव्या स्थानावर आहे. इतर संघांच्या तुलनेत ऑस्ट्रेलियाने या चक्रात आतापर्यंत सर्वाधिक सहा कसोटी सामने खेळले आहेत. त्यांनी तीन जिंकले, तर दोनमध्ये त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. एक सामना अनिर्णित राहिला, त्यामुळे त्यांचे ३० गुण झाले. त्याच वेळी, इंग्लंड १५ गुणांच्या टक्केवारीसह सातव्या स्थानावर आहे. या चक्रात इंग्लंडने पाच कसोटी सामने खेळले आहेत. दोन जिंकले आणि दोन हरले. एक कसोटी अनिर्णित राहिली. इंग्लंडचे नऊ गुण आहेत. श्रीलंका आणि दक्षिण आफ्रिका संयुक्तपणे आठव्या क्रमांकावर आहेत. दोन्हीची पॉइंट टक्केवारी शून्य आहे. ऑस्ट्रेलियन संघ कसोटीत गतविजेता आहे. यंदाच्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये त्यांनी टीम इंडियाचा पराभव केला. ऑस्ट्रेलिया आणि पाकिस्तान यांच्यातील मालिकेतील दुसरा कसोटी सामना २६ डिसेंबरपासून खेळला जाणार आहे, जो बॉक्सिंग डे कसोटी सामना देखील असेल. त्याचवेळी भारतीय संघ २६ डिसेंबरपासून दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. सामन्याबद्दल जर बोलायचे झाले तर, पर्थ येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटीत ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानचा ३६० धावांनी पराभव केला आहे. रविवारी कसोटीचा चौथा दिवस होता आणि कांगारूंनी चौथ्या दिवशीच पाकिस्तानचा पराभव केला. ऑस्ट्रेलियन संघाने पाकिस्तानला ४५० धावांचे लक्ष्य दिले होते. मात्र, यानंतर पाकिस्तानचा संघ प्रत्युत्तरात ८९ धावांवर गारद झाला. ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत पहिल्या डावात ४८७ धावा केल्या. प्रत्युत्तरात पाकिस्तानचा पहिला डाव २७१ धावांवर आटोपला. अशा प्रकारे ऑस्ट्रेलियन संघाला २१६ धावांची आघाडी मिळाली. ऑस्ट्रेलियाने आपला दुसरा डाव ५ बाद २३३ धावांवर घोषित केला. पहिल्या डावाच्या आधारे कांगारूंकडे २१६ धावांची आघाडी होती. अशा स्थितीत दुसऱ्या डावात ऑस्ट्रेलियाची एकूण आघाडी ४४९ धावांची झाली. कांगारूंनी पाकिस्तानला फॉलोऑन न देता दुसऱ्या डावात स्वतः फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि त्याचा फायदा त्यांना मिळाला.

### ग्लेन मॅकग्रा 563 पेक्षा जास्त विकेट

» रविवारी (१७ डिसेंबर) सामन्याच्या चौथ्या दिवशी लियॉनने पाकिस्तानच्या दुसऱ्या डावात फहीम अश्रफला आपला ५००वी विकेट बनवली. या ३६ वर्षीय फिरकीपटूने २०१९ नंतर एकदिवसीय किंवा टी-२० क्रिकेट खेळलेले नाही. त्याने परीक्षेवर लक्ष केंद्रित केले. यामुळे त्याची कारकीर्द लांबली. लिऑनने आपल्या १२३व्या सामन्यात ५०० वे यश संपादन केले. ऑस्ट्रेलियासाठी शेन वॉर्न (७०८) आणि ग्लेन मॅकग्रा (५६३) हे त्यांच्यापेक्षा जास्त विकेट घेणारे लोक आहेत.

# भारतीय गोलंदाजीपुढे यजमान सपशेल अपयशी!

## » इंडियाचा आफ्रिकेवर आठ गडी राखून दणदणीत विजय

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेला आजपासून सुरुवात झाली आहे. या मालिकेतील पहिला सामना आज जोहान्सबर्गच्या न्यू वांडरर्स स्टेडियमवर पार पडला. या सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा ८ गडी राखून दणदणीत पराभव केला. त्याचबरोबर तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशा फरकाने आघाडी घेतली.**



या विजयात अर्शदीप-आवेश आणि साई-श्रेयसने मोलाचे योगदान दिले. मालिकेतील दुसरा सामना १९ डिसेंबरला गकबेराह येथे होणार आहे. भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वनडे मालिकेत विजयाने सुरुवात केली आहे. भारताचा या वर्षातील वनडेतील हा २६ वा विजय आहे. १९९९ मध्ये ऑस्ट्रेलियाने २६ सामने जिंकले होते. कांगारू संघाने २०२३ मध्ये ३० सामने जिंकले आहेत. आफ्रिकन संघाचा पराभव करत भारताने मालिकेत १-० अशी महत्त्वपूर्ण आघाडी घेतली आहे. पाच वर्षांनंतर भारताने दक्षिण आफ्रिकेत वनडे जिंकली आहे. टीम इंडियाने शेवटचा २०१८ मध्ये सेंच्युरियनच्या मैदानावर विजय मिळवला होता. त्यानंतर २०२२ मध्ये सलग तीन सामन्यांत पराभव पत्करावा लागला होता. जोहान्सबर्गच्या न्यू वँडरर्स स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार एडन मार्करमने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला होता. त्यांचा संघ २७.३ षटकांत ११६ धावांत गारद झाला. प्रत्युत्तरात टीम इंडियाने १६.४ षटकांत ११७ धावा करत सामना जिंकला. भारताकडून पदार्पण करणाऱ्या साई सुदर्शनने नाबाद ५५ धावा केल्या. त्याने ४३ चेंडूंच्या खेळीत नऊ चौकार मारले. श्रेयस अय्यरने ४५ चेंडूत ५२ धावा केल्या. त्याने सहा चौकार आणि एक षटकार मारला. ऋतुराज गायकवाड पाच धावा करून बाद झाला. तिलक वर्मा एक धाव घेत नाबाद राहिला. दक्षिण आफ्रिकेकडून वियान मुल्डर आणि अँडिले फेहलुकवायो यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. भारताकडून अर्शदीप सिंग आणि आवेश खान यांनी गोलंदाजीत कमाल केली. दोघांनी मिळून नऊ विकेट घेतल्या. अर्शदीपला पाच आणि आवेशला चार विकेट मिळाल्या.

### रिझाला खातेही उघडता आले नाही

» डावाच्या दुसऱ्या षटकातच अर्शदीप सिंगने लागोपाठ दोन चेंडूत दोन बळी घेतले. या षटकातील चौथ्या चेंडूवर अर्शदीपने रीझा हेंड्रिक्सला बोल्ड केले. चेंडू त्याच्या बॅटच्या बाहेरील कडा घेऊन विकेटवर आदळला. रिझाला खातेही उघडता आले नाही. यानंतर पुढच्याच चेंडूवर अर्शदीपने रॅसी व्हॅन डर डुसेनला एलबीडब्ल्यू आऊट केले.